**सीएससी ई- गव्हर्नन्स सर्विसेस इंडिया लिमिटेड या केंद्र पुरस्कृत उपक्रमाला ग्रामविकास विभागात कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ उपलब्धतेसाठी मुदतवाढ देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण २४२५ /प्र.क्र.१२२/मातंक**
बाधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई - ४००००१.
**तारीखः** २२ सप्टेंबर, २०२५.

वाचा-

१) ग्रामविकास विभाग शासन परिपत्रक क्र. बामयं/प्र.क्र. ३३/ वित्त-९, दि. २६ ऑगस्ट, २०२०.

**शासन निर्णय -**

ग्रामविकास विभागाच्या अधिनस्त जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती, महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान (RGSA), राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण (SMURH), प्रधानमंत्री ग्रामसडक योजना (PMGSY) व मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (CMGSY) तसेच विभागांतर्गत इतर कार्यालयांमध्ये बाह्ययंत्रणेव्दारे (Outstanding) मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यासाठी अशा मनुष्यबळाची उपलब्धता करणारी अधिकृत एजन्सी म्हणून “सीएससी ई- गव्हर्नन्स सर्विसेस इंडिया लिमिटेड” या केंद्रिय उपक्रमाला दि. २६/०८/२०२० रोजीच्या शासन परिपत्रकान्वये मान्यता देण्यात आली आहे.

२. त्यानुसार शासनाने सीएससी ई- गव्हर्नन्स सर्विसेस इंडिया लिमिटेड यांचेसोबत दि. २१/०९/२०२० रोजी ५ वर्षाच्या कालावधीसाठी करारनामा केला असुन सदर करारनाम्यामध्ये मुदतवाढ देण्याची तरतुद आहे.

३. सीएससी ई- गव्हर्नन्स सर्विसेस इंडिया लिमिटेड यांचेकडुन पुरविण्यात येणाऱ्या सेवेचा कालावधी संपुष्टात येत असल्याने शासनास कंत्राटी पद्धतीने मनुष्यबळाची उपलब्धता करण्यासाठी सीएससी ई- गव्हर्नन्स सर्विसेस इंडिया लिमिटेड यांना दोन वर्षासाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

४. सदर प्रकरणी शासन परिपत्रक दि. २६/०८/२०२० मधील अटी /शर्ती कायम राहतील. याकरिता सीएससी ई- गव्हर्नन्स सर्विसेस इंडिया लिमिटेड या कंपनीसोबत नव्याने करारनामा करण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येईल.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध

करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२५०९२२१३०८२८६५२० असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRASHANT VINAYAKRAO PATIL

Digitally signed by PRASHANT VINAYAKRAO PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=2B1BAD66664B1E11E3BF66DB1D526143E814DB5F8C505422AF66A5628314537E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9524CAB2D5A858B4A01FF72F5CAE5FDDC4F8C964F3AFC6B6249294AD88EC870D, cn=PRASHANT VINAYAKRAO PATIL
Date: 2025.09.22 14:18:59 +05'30'

**(प्रशांत पाटील)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. सर्व सह /उपसचिव (ग्रामविकास विभाग), मुंबई.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान, नवी मुंबई.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण, नवी मुंबई .
५. संचालक (पंचायतराज), पुणे.
६. मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत व सा.प्र.वि.), जिल्हा परिषद (सर्व).
७. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व).
८. ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत (सर्व)
९. सीएससी ई- गव्हर्नन्स सर्विसेस इंडिया लिमिटेड, नवी दिल्ली ११०००३.
१०.निवडनस्ती (मातंक)

**प्रत माहितीसाठी -**

१. मा . मंत्री (ग्रामविकास) ,यांचे स्वीय सहायक.
२. मा. राज्यमंत्री (ग्रामविकास), यांचे स्वीय सहायक.
३. प्रधान सचिव (ग्रामविकास) ,यांचे स्वीय सहायक.